PDF Compressor Free Version

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन, सिंदेवाही जिल्हा-चंद्रपूर

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** सिंदेवाही

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0457 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 02/07/2026 02:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिंनाक पासून):** 01/07/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/07/2026
   **Time From (वेळेपासून):** 15:21 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 01/07/2026 **Time (वेळ):** 19:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 02/07/2026 02:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उप कार्यकारी अभिंयता ,मरावीवीकं मर्यादीत , उपविभाग कार्यालय सिंदेवाही ,सिंदेवाही

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

PDF Compressor Free Version

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रशांत नानाजी केदार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,चंद्रपुर,चंद्रपुर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,चंद्रपुर,चंद्रपुर ,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8788723765

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोद संतोष रंदये | | | 1. उपकार्यकारी अभियता , मरावीवीक मर्यादीत ,उपविभाग कार्यालय सिंदेवाही ,सिंदेवाही, सिंदेवाही,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | मोबाईल फोन | आयफोन व सॅमसंग कंपनीचे एकुण | 0.00 |

PDF Compressor Free Version



| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | 02 मोबाईल | |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराचे 06 नोटा | 3,000.00 |
| 3 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | sandisk कंपनीचे 32GB क्षमतेचे 02 मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस स्टेशन, सिंदेवाही जि.चंद्रपूर
दिनाक 01/07/2026

माझे नाव प्रशांत नानाजी केदार, वय 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिबधक विभाग, चंद्रपूर, मो.क्र. 8788723765
समक्ष पोलीस स्टेशन सिंदेवाही, जि. चंद्रपूर येथे हजर होउन तक्रार लिहुन देतो की, मी माहे जुन/2026 पासून लाचलुचपत प्रतिबधक विभाग चंद्रपूर येथे कार्यरत आहे.
दिनाक 01/07/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, कार्यालय चंद्रपूर येथे हजर असतांना वेळ 11/30 वा. दरम्यान मा. पोलीस उप अधीक्षक अनिल जिट्टावार सा. यांनी मला बोलावून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तक्रार असल्याचे सांगून तक्रारदाराची भेट करून दिली. त्यावरून सदर तक्रारदारास त्यांचे नाव पत्ता व तक्रारी संबधाने विचारणा केली असता तक्रारदाराने आपले नाव श्री. अतुल धर्मराज लांजेवार, वय 32 वर्षे, धंदा-ठेकेदारी रा. विनोबा नगर, तुमसर ता. तुमसर जि. भंडारा मो.क्र. 9284588937 असे सांगून त्यांना सुचीत केलेवरून त्यांनी हस्तलिखीत तक्रार सादर केली
सदर तक्रारीवरून लाच मागणीची पडताळणी करून पुढील लाचेचा सापळा कार्यवाही आयोजीत करण्यासाठी आमचे कार्यालयातील पोशि/महेश माहुरपवार यांचे हस्ते मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर यांना पत्र देवून दोन शासकीय पंच नामे श्री. विष्णु विजय ओडपल्लीवार, वय 45 वर्षे, कनिष्ट अभियंता, व श्री गजानन महादेव क्षिरसागर, वय 39 वर्षे,धंदा-नौकरी, वरिष्ट लिपीक, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 चंद्रपूर यांना उपलब्ध करून घेतले.
त्यांनतर दोन्ही पंचाना तक्रारदार श्री. अतुल धर्मराज लांजेवार, यांनी एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने दिलेल्या तक्रारीनुसार नमूद लोकसेवकाने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केल्यास व लाच मागणीबाबत योग्य पडताळणी झाल्यास त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करून कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे असे सांगून सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती विचारली असता दोन्ही पंचानी पंच म्हणुन काम करण्याची संमती दर्शविल्याने त्यांचे संमतीपत्र घेण्यात आले. त्यावरून पंच क्र. 1) श्री. विष्णु विजय ओडपल्लीवार, कनिष्ट अभियंता, व पंच क्र. 2) श्री. गजानन महादेव क्षिरसागर, वरिष्ट लिपीक हे काम पाहणार असल्याचे ठरविण्यात आले.
सापळा पार्टीतील सदस्य पोहवा/रविंकात इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, पोशि/महेश माहुरपवार, पोशि/सचिन गजभिये, पोशि/राजेंद्र चौधरी मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर तसेच तक्रारदार यांचा नमूद दोन्ही पंचांना परिचय करून देवून तक्रारदार श्री. अतुल धर्मराज लांजेवार यांचीच लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याचे सांगण्यात आले.

PDF Compressor Free Version

त्यांनतर आम्ही, तक्रारदार श्री. अतुल धर्मराज लांजेवार यांनी स्वहस्ताक्षरात लिहून दिलेली तक्रार दोन्ही पंचांना वाचावयास दिली ती तक्रार दोन्ही पंचांनी वाचली. त्यांनतर आमचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबधी तोंडी विचारपूस केली असून तक्रारदाराची तक्रार खालीलप्रमाणे आहे.

''माझे नाव :- श्री. अतुल धर्मराज लांजेवार, वय 32 वर्षे, धंदा- ठेकेदारी रा. विनोबा नगर, तुमसर ता. तुमसर जि. भंडारा मो.क्र. 9284588937

सविनय विंनती याप्रमाणे आहे की, मी माझे कुटुंबासह वरिल पत्यावर राहत असुन 'सनशाइन सोलर सिस्टीम अॅन्ड इलेक्ट्रीकल' या नावाने सोलर लावण्याची कंपनी चालवितो. प्रधानमंत्री सुर्य घर योजनेचे नॅशनल पोर्टल असून त्या पोर्टलवर ज्यांना घरी, दुकाण व अन्य ठिकाणी सोलर सिस्टीम बसवायची असेल तर ते या शासकीय पोर्टलवर अप्लाय करून त्यामध्ये असलेले वेंडर (पुरवठादार) सिलेक्ट करतात. त्यानंतर वेंडरला रिक्वेस्ट प्राप्त झाल्यावर वेंडर ग्राहकांशी संपर्क साधून त्यांना सोलर सिस्टीमबद्दल व लागणाऱ्या खर्चाबद्दल माहिती दिली जाते. त्यानंतर ग्राहक सहमत झाल्यानंतर सोलर सिस्टीम ग्राहकाने सांगितलेल्या ठिकाणी बसवून दिल्या जाते. त्यांनतर महावितरणचे rts.mahadiscom.in या ऑनलाइन पोर्टलवर सोलर सिस्टीम बसविल्याबाबतचे कागदपत्रे रिलीज ऑर्डर करीता अपलोड केल्यानंतर महावितरणचे साइटवर संबंधीत ग्राहकांचे नांव, सोलर सिस्टीम बसवून देणाऱ्या वेंडरचे नाव व अपलोड केलेले कागदपत्र शो (दिसल्यावर) झाल्यानंतर संबंधीत महावितरणचे अधिकारी हे सोलर लावलेल्या ठिकाणाची मौका चौकशी करून सोलर कनेक्शन जोडणीस नाहरकत असल्याबाबत रिलीज आर्डर देतात. त्यांनतर सोलर सिस्टीमचे कनेक्शन ग्राहकाचे विज मीटर सोबत जोडण्यात येते व त्यानंतर ग्राहकांना सोलरचा वापर सुरू करता येतो.

दिनाक 15/3/2026 रोजी अरूण कुंभारे रा. लोनवाही ता. सिंदेवाही व दिंनाक 4/4/2026 रोजी रविंद्र कोवे रा. कच्चेपार, ता. सिंदेवाही यांनी त्यांचे घराचे स्लॅबवर सोलर सिस्टीम बसविण्याकरीता प्रधानमंत्री सुर्यघर योजने अंतर्गत माझे कंपनीला वेंडर म्हणुन सिलेक्ट केले. त्यानुसार मी माझे कामगारांमार्फत त्याचे घराचे स्लॅबवर सोलर सिस्टीम बसवून दिले. त्यानंतर काम पुर्ण झाल्याबाबतचे कागदपत्रे महावितरणचे rts.mahadiscom.in या पोर्टलवर अपलोड केले होते. त्यानंतर दिनाक 23/6/2026 रोजी माझे चंद्रपूर येथील सोलरचे काम पाहणारा आयुष तिबुडे याने अॅग्रीमेंटसह इतर कागदपत्रे उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही येथे नेऊन दिले होते.

दिंनाक 29/6/2026 रोजी सकाळी 11/18 वाजता दरम्यान माझे मो.क्र. 9284588937 यावर मो.क्र. 7875015806 यावरून फोन आला व त्यांनी उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही येथील सहायक अभिंयता श्री.रंदये बोलत असल्याचे सांगून त्यांनी वरिल ग्राहकांचे सोलर सिस्टीम लावल्याबाबत विचारणा करून सबंधीत कागदपत्रे माझेकडे आले असून सोलर सिस्टीमचे काम बरोबर झाले आहे. परंतु एम.एस.इ.बी. कडून विज मिटरवर सोलर सिस्टीम कनेक्शन सुरू करण्यास हरकत नसल्याबाबत रिलीज ऑर्डर काढायचे असल्यास तुम्हाला दोन ग्राहकांचे प्रत्येकी दोन हजार रूपये प्रमाणे एकुण 4,000/- मला दयावे लागेल, अन्यथा जनरेशन मिटर टेस्टींग होणार नांही व रिलीज ऑर्डर काढणार नाही असे म्हणाला, त्यावर मी नाइलाजास्तव होकार देवून तुम्हाला कार्यालयात येवून भेटतो असे म्हणुन फोन कट केला.

मला श्री. रंदये, सहायक अभियंता, उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही जि. चंद्रपूर यांना 4,000/- रूपये लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने मी आज दिंनाक 01/07/2026 रोजी सकाळी 11/30 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपुर येथे प्रत्यक्ष हजर येवुन पोलीस उप अधीक्षक, श्री. अनिल जिट्टावार यांना भेटुन एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे सांगितले. त्यावरून त्यांनी आपणास बोलावून ओळख करून देवून आपणास पुढील कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सांगितले. त्यानंतर मी आपणास वरिलप्रमाणे सर्व हकीकत सांगितली असता आपण मला लेखी तक्रार देण्यास सांगून सहायक अभिंयता श्री रंदये यांनी मागणी केलेली लाच रक्कम जमा करण्यास सांगितले. यावरून मी आपणास माझे हस्ताक्षरात श्री. रंदये, सहायक अभिंयता, उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही जि. चंद्रपूर यांचे विरूध्द लेखी तक्रार देत आहे. गैरअर्जदार यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारी व्यवहार नसुन त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही. माझे वैयक्तिक बचतीतील 4,000/- रू. लाच रक्कम वापरण्याकरीता देत आहे.

तरी सोलर सिस्टीम बसवून दिलेल्या दोन ग्राहकांचे एम.एस.इ.बी.च्या विज मीटरवर सोलर कनेक्शन जोडण्यास नाहरकत असल्याबाबत रिलीज ऑर्डर (मंजुरी आदेश) काढून देण्याचे कामाकरीता 4,000/-रूपयाची लाचेची मागणी करणारे श्री. रंदये, सहायक अभिंयता, उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही जि. चंद्रपूर यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही होणेस विंनती आहे.''

अशाप्रकारे तक्रारदाराने दिलेली तक्रार व त्यांनी तक्रारीसंबधी तोंडी कथन केलेला मजकूर सारखाच असल्याची

PDF Compressor Free Version



दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर दोन्ही पंचानी व आम्ही तक्रारीवर सही केली. तसेच तक्रारदार यांनी सोलर सिस्टीम बसवून दिलेल्या दोन ग्राहकांचे काम पुर्ण झाल्याबाबत अहवालाच्या प्रती आमचेकडे सादर केल्याने त्याची झेराक्स प्रती काढुन आम्ही, दोन्ही पंचानी व तक्रारदार यांनी सहया केल्यावर ती कागदपत्रात समाविष्ट केली. त्यांनतर तक्रारदार यांचेकडील लाचेत वापरण्यात येणारे 4,000/-रूपयांचे नोटांचे क्रमांक संगणकावर टंकलीखीत करून त्यांची प्रिंट काढुन त्यावर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचानी सहया केल्या. वरील नोटा व नोटांचे क्रमांक नमुद असलेली प्रत आम्ही आमच्या ताब्यात घेतल्या. तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रू दराच्या 08 नोटांचे क्रमांक पंच क्रं. 1 यांनी वाचले पंच क्र.2 यांनी पडताळुन पाहिल्या.
500/-रू. दराच्या 08 नोटांचे क्रंमांक खालीलप्रमाणे

अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
अ.क्र
नोटांचे क्रमांक
1
1 DL 204482
2
2 HL 082923
3
3TD 360416
4
6UU 735101
5
9UU 427800
6
2FC 652088
7
1TT 793319
8
5FL 814190

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचाना लाचेच्या सापळा कार्यवाही करीता उपयोगात येणाूया अॅंथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा उपयोगाबाबत माहीती देवून अॅथ्रासिन पावडरचा संपर्क आलेल्या भागावर अल्ट्राव्हॅायलेट दिव्याचे प्रकाशात पाहिल्यास पावडरला निळसर रंगाची चकाकी दिसुन येते असे सांगीतले व त्याबाबत पोशि/राजेंद्र चौधरी यांचे हस्ते प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यानंतर पोशि/राजेंद्र चौधरी यांना सापळा पार्टीतुन वगळण्यात आले. तसेच आमचे कार्यालयीन डिजीटल व्हॉइस रेकार्डर बाबत माहिती दिली व त्याचे काम करण्याची पध्दतीबाबत पोशि/राकेश जांभुळकर यांचे मार्फतीने माहिती देण्यात आली असून याबाबत सविस्तर नोंद प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आलेली आहे.
त्यानंतर तक्रारदाराने तक्रारीत सांगितल्याप्रमाणे श्री. रंदये, सहायक अभिंयता, उपकार्यकारी अभिंयता, म.रा.वि.वि. क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही यांना आज रोजी कार्यालयात येवून भेटतो असे सांगितले असल्याने पुढील पडताळणी/सापळा कार्यवाही सिंदेवाही येथे जावून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. (याबाबत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक पंचनामा मध्ये घेण्यात आल्या).
त्यानंतर लाच मागणी पडताळणी/सापळा कार्यवाही करीता आम्ही, ट्रॅप बॅगमध्ये अल्ट्राव्हायलेट दिवा (टॉर्च), काळा कपडा, सिल करण्याचे साहित्य, मोजमाप करण्याचा टेप, 4 नविन मेमरी कार्ड, व्हाइस रेकॉर्डर, अॅन्थ्रासीन

PDF Compressor Free Version

पावडर लावलेली लाच रकमेचा लिफाफा व स्टेशनरी साहीत्य बरोबर ठेवुन असल्याची खात्री केली. शासकिय लॅपटॉप, लॅपटॉपचे चार्जर, प्रिन्टर, इत्यादी साहित्य त्यांचे जोडणीसह सोबत घेवून आम्ही, सोबत दोन्ही पंच, पोहवा रविंकात इंगळे, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, पोशि/महेश माहुरपवार असे शासकिय वाहन क्र. MH 34 8788 ने, व पोउपअधी श्री. जिट्टावार सा, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदिप ताडाम, पोशि/सचिन गजभिये, मपोशि/मेघा मोहुर्ले असे शासकीय वाहन क्र. MH 34 CJ 1533 मध्ये बसलो व तक्रारदाराने सोबत आणलेली पांढ्‌या रंगाची मारुती कंपनीची अर्टीगा चारचाकी वाहन क्र. MH 36 AL 2591 ही आमचे वाहनाचे मागेमागे आणण्यास तक्रारदारास सांगून 14/10 वा. ला.प्र.वि. चंद्रपूर येथून रवाना होवून मुल, राजोली मार्गे सिंदेवाही परिसरातील निंजन स्थळी 15/10 वा. दरम्यान पोहचलो. त्यांनतर तक्रारदाराचे तक्रारीबाबत सर्वांना थोडक्यात सांगून तक्रारदार व पंच तसेच सापळा पथकास पडताळणी कार्यवाहीबाबतच्या सुचना दिल्या.

त्यांनतर गै.अ. श्री. रंदये, सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही यांची लाचेची मागणी पडताळणी करणे असल्याने, पडताळणी कार्यवाही अनुषंगाने पंच क्र 1 यांचे हस्ते तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यानंतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र. 01 यांना गैरअर्जदारांची प्रत्यक्ष भेट घेवून सत्यता पडताळणी करण्याकरीता पाठविंताना पडताळणी कार्यवाहीबाबत तक्रारदार व पंच क्र. 1 यांना सविस्तर सुचना दिल्या.

सापळा पडताळणी कार्यवाहीकरीता आमचे सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी SanDisk कंपनिचे 32GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5617TP असे प्रिंट असलेले नवीन मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हॉइस रेकॉर्डर वेळ 15/21 वा. रेकॉर्डींग सुरू करून पंच क्रं. 01 यांचे आवाजात तक्रारदार यांचेसह लाच रक्कमेच्या पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याबाबत प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर तक्रारदार यांच्या गळ्यात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यांनतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 15/23 वा. तक्रारदाराने सोबत आणलेल्या अर्टीगा चारचाकी वाहन क्र. MH 36 AL 2591 नी रवाना केले. आम्ही सापळा पार्टीतील सदस्य व पंच क्र. 2 आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी तक्रारदार यांची परत येण्याची वाट पाहत थांबून राहीलो

त्यानंतर तक्रारदार हे पंच क्र. 1 यांचेसह आम्ही थांबून असलेल्या ठिकाणी वेळ 15/42 वा. परत आल्यावर आमचे सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी तक्रारदाराचे गळ्यातील व्हॉइस रेकॉर्डर बाहेर काढल्यानंतर पंच क्र. 1 यांच्या आवाजात वेळ 15/44 वा. बंद केले. त्यांनतर पंच क्र. 1 यांचे कडुन तक्रारदाराची अंगझडती घेउन अंगझडती यादी तयार करून यादीवर आम्ही, तक्रारदार व दोन्ही पंचांनी सहया केल्यावर अंगझडती यादीतील साहीत्य तक्रारदार यांना वेळीच परत करण्यात आले.

त्यानंतर पंच क्र. 1 श्री. विष्णु ओडपल्लीवार यांना घडलेल्या घटनाक्रमाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की, तक्रारदारासह त्यांचेकडील अर्टीगा चारचाकी वाहन क्र. MH 36 AL 2591 वाहनाने गैरअर्जदार यांचे कार्यालयाजवळ जावून वाहन बाजुला लावून कार्यालयात गेलो तेथे हजर असलेल्या इसमास तक्रारदाराने रंदये सर म्हणुन विचारले तर त्याने मागे असे म्हणुन सांगितल्याने आम्ही कार्यालयातील मागील कक्षात गेलो असता तिथे एक इसम खुर्चीवर बसून दिसल्याने तक्रारदाराने सर येवू का म्हणुन आपला परिचय दिला तर त्यांनी कक्षात असलेल्या खुर्चीवर बसण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदाराने त्याचे ग्राहकांचे सोलर सिस्टीमचे रिलीज आर्डर बाबत बोलणी केली. त्यादरम्यान गै.अ. रंदये यांनी तक्रारदारास माझे बाबत विचारणा केली तर तक्रारदाराने मित्र असल्याचे सांगितले. तसेच तक्रारदारानी गै.अ. रंदये यांचे नावाबाबत कन्फरमेशन केले. त्यांनतर तक्रारदाराने कस करायचे म्हणुन विचारणा केली तर त्यानीं दोन हजार असे म्हटले तर तक्रारदाराने किती टोटल चार हजार लागतील का असे म्हणाले त्यावर गै.अ. रंदये यांनी हो असे म्हणाला असता तक्रारदाराने गै.अ. रंदये यांना काही कमी करा म्हणुन विंनती केली तर गै.अ. रंदये यांनी पंधराशे देवून दया नाहीतं, असे म्हणाल्याने तक्रारदाराने टोटल तीन हजार दयायचे का पंधराशे रूपये असे म्हणाला गै.अ. रंदये हा तक्रारदारा सोबत बोलणी दरम्यान सर नी सांगितले, सरांना विचारतो असे बोलून डी.वाय सरांचे नाव समोर करीत होता. त्यांनतर गै.अ. रंदये यांनी डी वाय सरांना फोन लावतो असे सांगून त्यांनी फोन लावला तेव्हा समोरील व्यक्तीचे आवाज ऐकू येत नव्हते. फोन बंद केल्यानंतर तक्रारदाराने काय म्हणाले सर म्हणुन विचारले तर गै.अ. रंदये यांनी साहेबांनी एकदा साइट बघून करून घ्या असे म्हटले. त्यांनतर गै.अ. रंदये यांनी तक्रारदारास मिटर बाबत विचारले तर तक्रारदाराने मीटर गाडीत असल्याचे सांगून काही वेळ बोलणी झाल्यानंतर तक्रारदाराने येतो दहा मिनीटांनी असे सांगिंतल्यानतर गै.अ. रंदये यांनी दहा मिनीटे, मीटर दाखवून बघा असे म्हणाल्याने तक्रारदाराने हो सर घेवून येतो सर असे म्हणुन आम्ही तिथून निघून आपण थांबून असलेल्या ठिकाणी तक्रारदाचे वाहनाने परत आलो असे सांगितले. त्यावर तक्रारदार याने पंच क्र. 1 यांनी वरील

PDF Compressor Free Version



सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.
सदर संभाषण व्हॉइस रेकॉर्डरच्या मेमरी कार्ड मध्ये '' FOLDER01'' मधील फाइल क्र 260701_1521 मध्ये रेकॉर्ड झाले असून सदर संभाषण लॅपटॉपमध्ये कॉपी करून दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क्र. 1 व तक्रारदाराने सांगितलेल्या हकीकत व त्यांनी दिलेल्या दुजोऱ्यावरुनं तसेच तक्रारदार व गैरअर्जदार यांचे ऐकलेल्या संभाषणावरून गै.अ. श्री. रंदये, सहायक अभियता, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग कार्यालय सिंदेवाही यांनी तक्रारदारास त्यांनी सोलर सिस्टीम बसवून दिलेल्या दोन ग्राहकांचे म.रा.वि.वि.क. मर्यादीतच्या विज मीटरवर सोलर कनेक्शन जोडण्यास नाहरकत असल्याबाबत रिलीज ऑर्डर (मंजुरी आदेश) काढून देण्याचे कामाकरीता 4,000/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 3,000/- लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे आमचे व दोन्ही पंचांचे स्पष्ट मत झाले. तसेच आम्ही तक्रारदारास गै.अ. रंदये हे डीवाय साहेब यांचे नाव घेत असल्याचे विचारणा केली तर तक्रारदाराने गै.अ. रंदये यांनीच लाचेची मागणी केली असून तो डी.वाय सरांचे नाव समोर करीत होता. परंतु इतर कोणीही मला लाचेची मागणी केली नसल्याने गै.अ. अमोद रंदये यांचे व्यतिरिक्त इतर कोणाविरूध्द तक्रार नसल्याचे सांगितले. तसेच त्यांना मिटर बाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील अर्टीगा गाडीमध्येच असलेले मिटर पंचासमक्ष दाखवून हेच मिटर टेस्टिंगसाठी असल्याचे सांगितले. त्यावरुन आम्ही तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह गै.अ.अमोद रंदये यांचेकडे सापळा कार्यवाही करीता पाठविण्याचा सर्वानुमते निंणय घेतला. सदर कार्यवाही संपताच शब्द:श स्क्रिप्ट तयार करण्याची तसेच पडताळणी कार्यवाही मेमरी कार्डची हॅशव्हॅलु काढल्यानंतर जप्ती करण्याची तजवीज ठेवली आहे.
त्यानंतर सापळा कार्यवाही पुर्वी तक्रारदार यांची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवुन हस्तलिखीत अंगझडती तयार करण्यात आली. सापळा कार्यवाही संबंधाने तक्रारदार व पंच क्र. 1 व 2 यांना सुचना देण्यात आल्यात तसेच स्टाफ यांना आपापल्या भुमिकेबाबत माहिती देण्यात आली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पंच क्र. 2 यांनी लाच रक्कम 500 रू. दराच्या 06 चलनी नोटा असे 3,000/- रुपये आपले उजवे हाताने घेवुन तक्रारदार यांचे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवले. उर्वरित 1TT 793319 व 5FL 814190 या क्रमांकाचे दोन नोटा वेगळ्या लिफाप्यात ठेवण्यात आले. त्यानंतर पंच क्र. 2 यांनी साबण पाण्याने हात स्वच्छ धुवुन घेतले. असून कार्यवाही संपताच तक्रारदार यांना उर्वरित दोन नोटा परत करून पोचपावती लिहून घेण्याची तजवीज ठेवली आहे
त्यानंतर आमच्या सुचनेवरुन पोशि/राकेश जांभुळकर यांनी व्हाइस रेकॉर्डर मधील SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5617TP असे प्रिंट असलेले मेमरी कार्ड मध्ये फाइल क्र. 260701_1521 व्यतीरीक्त इतर कोणतीही फाइल नसल्याबाबत खात्री करून दिली. तसेच पोहवा/रविंकात इंगळे यांना लाचरक्कम जप्तीचे व्हिडीओ चित्रीकरण्याबाबत सुचना दिली असता त्यांनी कार्यालयीन SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरामध्ये SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5617T6 असे पिं्रट असलेले मेमोरी कार्ड टाकुन त्याचे ताब्यात घेतले.
त्यानंतर पोशि/राकेश जांभुळकर यांनी वरीलप्रमाणे मेमरी कार्ड टाकुन असलेले व्हाइस रेकॉर्डरमधील 16/06 वा. रेकॉर्डींग सुरू करून पंच क्र. 01 यांचे आवाजात सापळा कार्यवाही प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर डिजीटल व्हॉइस रेकॉर्डर तक्रारदाराचे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र. 1 यांना वेळ 16/08 वा. तक्रारदाराचे चारचाकी वाहनाने रवाना केले. त्यांचे मागोमाग आम्ही, पोउपअधी श्री. जिट्टावार सा. , पंच क्र. 2 व पोहवा/रविंकात इंगळे, पोहवा/हिवराज नेवारे, पोशि/प्रदीप ताडाम, पोशि/राकेश जांभुळकर, पोशि/अमोल सिडाम, पोशि/महेश माहुरपवार, पोशि/सचिन गजभिये, मपोशि/मेघा मोहुर्ले, चापोशि/सतिश सिडाम, सर्व ला.प्र.वि. चंद्रपूर व चापोशि संदीप कौरासे मो.प.वि.चंद्रपूर असे सोबत असलेल्या दोन्ही शासकीय वाहनाने तक्रारदाराचे वाहनाचे मागेमागे गेलो तेव्हा तक्रारदार हे उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या उपविभाग सिंदेवाही या कार्यालयाजवळ आपले वाहन थांबवतांना दिसल्याने आम्ही आमचे दोन्ही वाहन मागेच थांबून वाहनातच बसून गै.अ. यांचे कार्यालय दिसणार व कुणालाही संशय येणार नाही अशाप्रकारे थांबून राहीलो. काही वेळानी तक्रारदार हे गै.अ. यांचे कार्यालयाचे बाहेर येऊन त्याचे डाव्या हातातील मीटरचे दोन बॉक्स खाली ठेवून गैरअर्जदाराने लाच स्विकारल्याबाबत आपले अंगातील हुडी टिंशटचे कॉलरला लागून असलेली टोपी डाव्या हातानी डोक्यावर ठेवून नियोजीत इशारा केला. तेव्हा आम्ही तसेच सोबत असलेले पोउपअधी श्री. जिट्टावार सा., पंच क्र. 2 व स्टॉफ हे वाहनातुन उतरून घटनास्थळी आलोत व तक्रारदारास बाजुला थांबू्न राहण्याबाबत इशारा केला तेव्हा कार्यालयाचे बाहेर येत असलेल्या इसमाकडे तक्रारदाराने बोटानी इशारा करून गैरअर्जदार असल्याचे दाखविले तेव्हा आम्ही त्याचेजवळ गेलो असता त्याने पैसे घेतले नसल्याबाबत सांगितले त्यावर त्यास यापुर्वी तुमच्याकडे तक्रारदार आला तेव्हा कोणत्या साहेबांना फोन केला अशी विचारणा केली तर त्यांनी श्री. डोंगरे, उपकार्यकारी अभियता यांना फोन केला होता असे सांगितल्याने गै.अ. रंदये यांना उपकार्यकारी अभियता यांना फोन

PDF Compressor Free Version

करून तक्रारदाचे काम करून दिले व त्यांनी दिलेले पैसे काय करायचे, याबाबत बोलणी करण्याबाबत सुचना दिलेवरून त्यानी त्यांचे मोबाइलमधील कॉनटॅक्ट लिस्ट मध्ये सेव्ह असलेल्या श्री. डोंगरे यांचे मोबाइलवर दोनवेळा फोन लावला परंतु त्यांनी फोन रिसीव्ह केला नाही. त्यांनतर आम्ही त्यास त्याचे कक्षात घेवून जावून पोशि/राकेश जांभुळकर यांचे हस्ते पंच क्र. 1 यांचे आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हाइस रेकॉर्डर 16/33 वा बंद करण्यात आले.
त्यानंतर गै.अ. रंदये यांना कक्षातील खुर्चीवर बसवून आम्ही, पंच क्र. 01 यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी खुर्चीवर बसलेल्या गै.अ. यांचेकडे बोट दाखवून सदर इसम गै.अ. रंदये, सहायक अभियंता असून त्यांचे सांगणेवरून तक्रारदाराने त्याचे समोरील टेबलवर लाच रक्कम ठेवली असल्याचे सांगितले. आम्ही गै.अ. श्री. रंदये यास सापळा कार्यवाही कामी सहकार्य करण्यास सांगून त्यांचे संपूर्ण नाव, पत्ता इ. माहिती विचारली असता त्याने आपले नाव- अमोद संतोष रंदये, वय 38 वर्षे, धंदा नोकरी पद सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या. उप विभाग कार्यालय सिंदेवाही ता. सिंदेवाही जि.चंद्रपूर रा. सुमीत्रा नगर, हनुमान मंदीरजवळ, तुकूम, चंद्रपूर ता.जि.चंद्रपूर असे सांगितले.
त्यानंतर उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या. उप विभाग सिंदेवाही कार्यालयातील गै.अ. श्री. रंदये यांचे कक्षेतील सर्व लाइट बंद करून प्रकाशाची तिव्रता कमी करून आमुचे सुचनेवरून पोशि/अमोल सिडाम यांनी अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात आम्हा सर्वाचे हात तपासले असता कोणाचाही हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून येत नसल्याची श्री. अमोद रंदये यांना खात्री करून देवून गै.अ. श्री. अमोद रंदये यांचे टेबलवर ठेवून असलेल्या नोटांना अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासले असता नोटांना निळसर रंगाची चकाकी दिसून आल्याने आमचे व दोन्ही पंचाची लाच रक्कम असल्याची खात्री झाली. सदर नोटा पंच क्र. 2 यांना ताब्यात घेण्यास सांगितले. त्यांनतर गै.अ. अमोद रंदये यांचे दोन्ही हात अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे हाताला निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही.
त्यानंतर आमचे सुचनेनुसार पंच क्र. 1 यांनी प्रात्यक्षिक पंचनाम्यामध्ये नमूद असलेल्या व पडताळणी नंतर काढून ठेवलेल्या नोटां व्यतिरीक्त लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांक वाचून पाहीले व पंच क्र. 2 यांनी टेबलवर मिळालेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे क्रमांकाशी जुळवुन पाहीले असता 3,000/-रूपये (ज्यात 500 रू दराच्या 06 नोटांचे क्रमांकाशी जुळुन आले. नमुद लाच रक्कम लिफाप्यामध्ये सुरक्षित ठेवून सिलबद केल्यानंतर लाच रक्कमेचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला. त्या जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचांनी सहया केल्या परंतु व गै.अ. अमोद रंदये यांनी सही करण्यास नकार दिल्याने पंच क्र. 1 यांचेकडून जप्तीपत्रक व लेबलवर तसे नमूद करण्यात आले आहे.
त्यांनतर गै.अ. अमोद रंदये यांची अंगझडती घेवून अंगझडतीत मिळुन आलेला वस्तुची वेगळी यादी तयार करण्यात आली. अंगझडतीत मिळुन आलेले साहित्य व रोख रक्कम आरोपींना वेळीच परत करण्यात आले. अंगझडती यादीवर आम्ही, दोन्ही पंच आणि गै.अ. अमोद रंदये यांनी स्वाक्षरी केलेली आहे. गै.अ. अमोद रंदये यांचा मोबाइल आम्ही तपासकामी जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्याची तजवीज ठेवली. सदर बाबतची व्हिडीओ रेकॉडीग करण्यात आली.
त्यांनतर तक्रारदाराचे दोन्ही हात व त्यांनी परिधान केलेल्या जिन्स पॅन्ट अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासले असता त्यांचे उजव्या हाताचे संपुर्ण बोटांना व जिन्स पॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्याला निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.
सदरचे घटनास्थळ हे उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या. उप विभाग कार्यालय सिंदेवाही ता. सिंदेवाही जि.चंद्रपूर येथिल आहे. त्यानंतर आम्ही पोशि/प्रदीप ताडाम यांना घटनास्थळाचा कच्चा नकाशा काढण्याबाबत सुचना देवून कार्यवाहीदरम्यान कोण कुठे होते त्याबाबत सविस्तर सागितले असता त्यांनी सदर घटनास्थळाचा कच्चा नकाशा तयार केला. त्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या. सदरचे ठिकाणी लोकांची गर्दी होत असल्याने कार्यवाहीमध्ये बाधा येवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस स्टेशन सिंदेवाही समोरच असल्याने आम्ही पुढील पंचनामा कार्यवाही करिता पो.स्टे सिंदेवाही येथे जाण्याचे ठरवून 17/10 वा. तिथे पोहचलो.
त्यांनतर तक्रारदाराची पंच क्र. 1 यांचे हस्ते अंगझडती घेवून मिळालेले साहीत्य व रोख रक्कमेच्या नोंदी घेतल्यानंतर मिळालेले साहीत्य परत करण्यात आले. तक्रारदार दोन्ही पंच व आम्ही अंगझडती यादीवर स्वाक्षरी केली.
यानंतर आम्ही, पंच क्र. 1 श्री. विष्णु ओडपल्लीवार यांना सापळा कार्यवाहीवेळी तक्रारदार व गै.अ. अमोद रंदये यांच्यात लाच देवाण घेवाण झालेल्या संभाषणाविषयी विचारले असता पंच क्र. 1 यांनी सांगितले की, ''मी तक्रारदारासह त्याचेकडील MH 36 AL 2591 वाहनाने गै.अ. यांचे कार्यालयाजवळ जावून वाहन लावल्यानंतर गै. अ. रंदये याचे कक्षात गेलो तेव्हा तक्रारदाराने गै.अ. अमोद रंदये यास मीटर सोबत आणल्याचे सांगून मागणी केलेली रक्कम सोबत आणले असल्याचे सांगितले तेव्हा गै.अ. यांनी तक्रारदारास खुर्चीवर इशाराने बसण्यास सांगून त्यांचेकडील मीटर घेवून त्याची माहीती लिहून घेतली व त्यांनतर कामा बाबत बोलून मीटर तक्रारदाराकडे परत देवून

PDF Compressor Free Version

तुम्ही मीटर लावू शकता असे म्हटला त्यांनतर तंक्रारदाराने त्यांचे जिन्सपॅन्टचे समोरील उजव्या खिश्यातून उजव्या हाताने लाच रक्कम काढून गै.अ. रंदये यांना हे सर म्हणुन पैसे बाबत इशारा केला तर गै.अ. रंदये यांनी खुर्चीसमोरील टेबलवर हाताने इशारा करून ठेवून दया तिथ वरती असे म्हणाला. तेव्हा तक्रारदाराने लाच रक्कम ठेबलवर ठेवत गै. अ. रंदये यास तीन हजार बोलले होते तुम्ही असे म्हणाला असता गै.अ. रंदये यांनी ठिक आहे न काही प्राब्लेम नाही असे म्हणाला. त्यांनतर तक्रारदारा सोबत कार्यालयाचे बाहेर आल्यावर तक्रारदारानी सापळा पथकास नियोजीत इशारा करताच आपण त्याठिकाणी आले'' असे सांगितले. त्यावरून तक्रारदार याने पंच क्र. 1 यांनी सांगितलेली हकीकत बरोबर असल्याचे सांगुन त्यास दुजोरा दिला.

त्यांनतर आमचे सुचनेनुसार सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे गळयात अडकवून पाठविलेले व्हाइस रेकॉर्डर पोशि/राकेश जांभुळकर यांनी लॅपटॉपला कनेक्ट केले असता मेमोरी कार्डमध्ये FOLDER 01 मध्ये 260701_1606 या नावाची फाइल दिसून आली. सदर फाइल कॉपी केल्यानंतर आम्ही, दोन्ही पंच, तक्रारदार यांचेसमक्ष व्हॉइस फाइल फॉरवर्ड करुन ऐकली.

त्यानंतर मेमरीकार्ड मधील पडताळणी कार्यवाहीची व्हाइस फाइल 260701_1521 व सापळा कार्यवाहीची व्हाइस फाइल 260701_1606 लॅपटॉपमधील Sevenza Hash Calculator या सॉफ्टवेअरद्वारे हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढल्यानंतर त्या हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्रावर दोन्ही पंचानी व पोशि/राकेश जांभुळकर यांनी सहया केल्या आहेत. सदर सापळा कार्यवाहीचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5617TP असे प्रिंट असलेले मेमोरी कार्ड जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करून एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवून जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी स्वाक्षरी केल्यावर लाखेने सिंलबद केले.

तसेच आमचे सुचनेवरून पोहवा/रविंकात इंगळे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान गै.अ. अमोद रंदये यांचे टेबलवरील लाच रक्कमेची जप्ती व त्याची अंगझडती कार्यवाहीचे चित्रीकरणाचे SanDisk कंपनीचे 32 GB क्षमतेचे सिरीअल नंबर 5334XV5617T6 असे प्रिन्ट असलेले मेमोरी कार्ड SONY कंपनीचे हॅन्डीकॅम कॅमेरा लॅपटॉपला कनेक्ट केले असता MP_ROOT या मध्ये MAH00001.MP4 या नावाच्या व्हिडीयो फाइल दिसुन आली. त्यां फाइलचे Sevenza Hash Calculator सहायाने हॅश व्हॅल्यु काढून प्रिन्ट काढली. त्यावर दोन्ही पंचानी व पोहवा/रविंकात इंगळे यांनी सही केल्यानंतर कागदपत्रात समाविष्ट केली. सदर फाइल्स असलेले सदरचे मेमरी कार्ड एका कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवले. सदर लिफाप्यावर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केल्यावर लिफापा लाखेने सिंलबद करुन आम्ही आमचे ताब्यात घेतला.

त्यानंतर गै.अ. अमोद रंदये यांना झालेल्या पडताळणी /सापळा कार्यवाहीबाबत त्यांचे काय म्हणणे आहे? याबाबत लेखी निवेदन लिहून देण्याकरीता सांगितले व कोरे कागद आणि पेन त्यांना उपलब्ध करून दिले. त्यावरून त्यांनी त्यांचे स्वहस्ताक्षरातील निवेदन आम्हास सादर केले. सदर निवेदनावर दोन्ही पंचानी स्वाक्षऱ्या केल्या व आम्ही समक्ष म्हणुन स्वाक्षरी केली.

त्यानंतर गै.अ. अमोद रंदये यांचेकडून ताब्यात घेण्यात आलेला आयफोन व सॅमसंग कंपनीच्या मोबाइलची अनुक्रमे पाहणी करून दोन्ही मोबाइल वेगवेगळया लिफाप्यात ठेवून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले. त्या दोन्ही जप्तीपत्रक व लेबलवर आम्ही, दोन्ही पंचानी व गै.अ. अमोद रंदये यांनी सहया केल्यात.

तरी यातील आलोसे अमोद संतोष रंदये, वय 38 वर्षे, धंदा नोकरी पद सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.क. मर्या. उप विभाग कार्यालय सिंदेवाही ता. सिंदेवाही जि.चंद्रपूर यांनी सोलर सिस्टीम बसवून दिलेल्या दोन ग्राहकांचे म.रा.वि.वि.क्र. मर्यादीत च्या विज.मीटरवर सोलर कनेक्शन जोडण्यास नाहरकत असल्याबाबत रिलीज ऑर्डर (मंजुरी आदेश) काढून देण्याचे कामाकरीता 4,000/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 3,000 /- लाच रक्कमेची मागणी करून स्विकारल्याने त्यांचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988, (सुधारणा 2018) कलम 7 अन्वये कायदेशीर कार्यवाही होणेकरीता माझी कायदेशीर फिंयाद आहे.

( प्रशांत एन. केदार )

पोलीस निरीक्षक

लाचलुचपत प्रतिंबधक विभाग चंद्रपूर

PDF Compressor Free Version



13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

KANCHAN Padmakarrao PANDE(I (Inspector)) / PQBN84034 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

PDF Compressor Free Version



**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** KANCHAN Padmakaı
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN84034

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15.**Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

ठाणे अंमलदार
पो. स्टे. सिंदेवाही
जि. चंद्रपूर

पोलीस स्टेशन, सिंदेवाही
जिल्हा-चंद्रपूर

PDF Compressor Free Version



**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)